# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०१३.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ वैवाहिक जीवन आणि गृहसौख्य या दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. स्वत:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील मतभेद, वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवन ढवळून निघेल. तसेच कुटुंबात घडणाऱ्या असमाधानकारक घटना, कौटुंबिक भांडणतंटे, राहत्या जागेसंबंधी किंवा स्थावरसंबंधी वाद अशापैकी घटनांनी गृहसौख्य लाभणे कठिण दिसते. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या साहित्यिकांचे ग्रंथलेखन प्रसिद्ध होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांती लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात मानसिक चिंता व शारीरिक अनारोग्य यांचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काही मंडळीना ताप, अपचन, पोटविकार अशापैकी कसला तरी आजार त्रस्त करील. मुलांपैकी काहींचे विक्षिप्त आचरण, काहींचे अध्ययनाकडे दुर्लक्ष, काहींचे अनारोग्य अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुख लाभणेही अशक्य दिसते. पण शुक्राच्या अनुकुलतेमुळे काही मंडळींच्या व्यवसायात वाढ होऊन भरभराट होईल; तर काही मंडळीना मानाचे स्थान व प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. काही मंडळीना भूमिलाभ होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. असे असले तरी कुमार्गी मित्र व कुसंगती यांमुळे काही मंडळीना आर्थिक नुकसान सहन करावे लागेल व त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. काही मंडळींना वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव या महिन्याच्या काळात अत्यंत लहरी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अकारण नको त्या गोष्टी घडण्याची शक्यता आहे. जपा. विशेष करून दिनांक १८-१९-२० ह्या तीन दिवसांत विशेष जपणे अगत्याचे होईल. महिन्याच्या पहिल्या सप्ताहात कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण नंतर गैरसमज, असमाधानकारक घटना, राहत्या जागेची समस्या, स्थावर समस्या अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते, जपा. महिन्याच्या पूर्वार्धात संततीचे आजार, स्वत:चे अनारोग्य, प्रिय जनांपासून होणारे दूरत्व, नोकरीत वरिष्ठांचा त्रास अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. आरोग्य सुधारेल, मनोनुकुल घटना घडतील, नोकरदार मंडळीना लाभदायक घटना घडत असल्याचा अनुभव येईल. व्यापार, व्यवसायात परधर्मीयांशी संबंध असणारांना अशा संबंधामुळे विविध प्रकारचे लाभ होतील. मानसिक रोग तज्न्य, द्रव पदार्थांचे व्यापारी, वकिली, सल्लागारी, अकौण्टन्सी असे व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण सप्तम स्थानी मंगळाच्या राशीचा शुक्र असल्यामुळे जीवनसाथीस कसला तरी शारीरिक-मानसिक त्रास होणे संभवते. तसेच

व्यापार-व्यवसायात स्त्रीवर्गाकडून त्रास होणे संभवते. जपा. काही मंडळीना कुसंगतीचा त्रासही सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. शुक्र-हर्षल शुभ योगामुळे काही मंडळीना अनपेक्षित अर्थलाभ होणे संभवते. पण मित्रांशी भांडणे होणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख व संतत्तिसुख या दृष्टीने या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. महिन्याच्या प्रथम सप्ताहात उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. रवि-शनि-राहू प्रतिकुल असल्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य सहन करावे लागेल. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. प्रिय जनांपासून दूरत्व आल्यामुळे मन अस्वस्थ राहील.

या राशीच्या विद्यार्थ्यांना काही कारणाने नैराश्य येणे संभवते. पण बुध-गुरु शुभ योग असल्यामुळे शैक्षणिक प्रगतीत फ़ारसा अडथळा येणार नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. नैराश्य व मनस्ताप यांमुळे छोटेमोठे अपघात होणे संभवते. जपा. मंगळ ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर मन:शक्ती वाढेल, हिंमत वाढेल व थोडा हुरूप येईल. बौद्धिक, शैक्षणिक, शास्त्रीय संशोधनात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. काही मंडळीना परदेशगमनाचे योग येतील. तसेच दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांनाही काळ लाभदायक होईल. गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती साधणे शक्य होईल. पण यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. श्रद्धा असेल तर गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व हनुमंताची उपासना अनुकुल होईल. "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे आणि हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमितपणे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख व गृहसौख्याच्या दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण शुभ ग्रह शुक्राची अनुकुलता व गुरुची शुभ दृष्टी असल्याने परिस्थिती अटोक्यात राहील. महिन्याच्या पहिल्या सप्ताहात स्वाभाविक दोषांमुळे अकारण दगदग, श्रम होणे संभवते. त्यामुळे नंतर शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. डोळे, मान, घसा, दाढा यापैकी कसला तरी विकार त्रस्त करील. अपेक्षित खर्च निभावण्यासाठी अधिक परिश्रम करावे लागतील. देणे द्यावे लागेल; पण येणे वसूल होणार नाही. त्यामुळे आर्थिक चिंता सतावेल. जपा. शासकीय ,निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. वरिष्ठ प्रशंसा करतील, काही मंडळींना अधिकार पद मिळू शकेल' तर काहींना उच्च पद प्राप्त होणेही शक्य आहे. त्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळीनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा कसोशीने प्रयत्न करावा. शास्त्रीय संशोधन व गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. अध्यात्म, समाजसेवा अशा कार्याची आवड असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या युवकांनी नवीन असे काही करण्याचा विचारही करू नये. आहे तो नोकरी-व्यवसायच सांभाळावा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करावी.

**(५) सिंह** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. महिन्याच्या पूर्वार्धात अकारण खर्च, आर्थिक नुकसान, मानहानी, चिंता, गैरसमजुती, वाद, भांडणे, जुन्या दबलेल्या प्रकरणांचा त्रास अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून

डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील. दिनांक ५-६-७ हे तीन दिवस अतिशय सावधानतेने व मन व बुद्धी शांत व स्थिर राखण्याचा प्रयत्न करूनच व्यतीत करा. या राशीच्या चतुर्थ स्थानी शुक्र असला तरी त्यावर मंगळाची दृष्टी असल्याने अपेक्षित कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेलच याची शाश्वती नाही. भावंडविषयक एखादी चिंता अस्वस्थ करील. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. काही मंडळीना अपेक्षित उत्तम नोकरी वा व्यवसाय प्राप्त होईल. वकिली, सल्लागारी व्यवसाय, अकौण्टन्सी असे बौद्धिक चिकित्सक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच गुरु-नेपचून शुभ योगामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल व सात्विक सुखशांती लाभेल. दांपत्यजीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच अपेक्षित संततिसुख लाभेलच याची शाश्वती नाही. अपघात भय असल्याने सतत सावधानतेनेच आचरण करा. श्रद्धा असेल तर कुलस्वामिनीची उपासना तारून नेईल.

**(६) कन्या -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ सर्वांगीण दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. केवळ शुभ ग्रह गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. मन नैराश्यपूर्ण झाले असल्याने काही मंडळीना काल्पनिक चिंता सतावतील व उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे केवळ यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाच या महिन्याचा प्रथम सप्ताह अनुकुल असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. रवि-मंगळ-शनि पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी सतत मनाविरुद्ध घटना घडतील व अपेक्षाभंग होईल. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी अति विचार करू नये व मन शक्य तितके शांत राखण्याचा प्रयत्न करावा. सतत नम्रतेचे आचरण करावे. अकारण दगदग करू नये. विपरीत काळ सरल्यावर अनुकुल काळ येणारच याची खात्री बाळगून मनावर संयम ठेवून व सहनशील बनून सतत आचरण करा. तेच सुखाचे होईल. मौन व्रत धारण करा. तरच फ़ारसे अनारोग्य होणार नाही व काही प्रमाणात कौटुंबिक सुख व दांपत्यजीवनातील सुख लाभू शकेल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची व श्रीहनुमंताची उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे व सध्या एकूण सर्वच ग्रहमान या राशीच्या मंडळीना प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळीनी सर्वांगीण आरोग्य उत्तम राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अध्यात्मात रस असेल तर चंद्र-नेपच्यून शुभ योगामुळे आध्यात्मिक उपासना अनुकुल होईल व त्यामुळे मन व बुद्धी स्थिर आणि शांत राखणे शक्य होईल. सतत मनाविरुद्ध घटना घडत असल्याचा अनुभव येईल व त्यामुळे गहरे नैराश्य येऊ शकेल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर अति विचार न करता अध्यात्मिक साधनेद्वारे मन:शक्क्ती वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अति विचाराने डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा त्रास होण्याची शक्यता आहे. या राशीच्या मंडळीना वातविकारांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांशी भांडणे होणे संभवते. तसेच स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, खळबळजनक

घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. नवीन उपक्रम हाती घेण्याचा विचारही करू नका. स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा मतभेदांमुळे वैवाहिक जीवनातही सुखसमाधान लाभेलसे दिसत नाही. जपा. मित्रांशी वितुष्ट येऊ देऊ नका. मंगळ ग्रह या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. या राशी च्या धनस्थानी असलेल्या शुक्रामुळे व भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या प्रतिकुल काळातही मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे त्यामुळे सदैव सावधानतेने आचरण करा. आर्थिक व्यवहार जपून करा. फ़सवणूक होणार नाही याची काळजी घ्या. व्ययस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अकारण मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. दिनांक ७ ते ९ हे तीन दिवस विशेष जपा.
काहीही कारणाने गैरसमज होऊन कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येऊ शकेल. महिन्याच्या प्रथम सप्ताहात शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना अनुकुल व लाभदायक होईल. तेव्हा जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना, औषधविक्रेत्यांना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणांनी मनस्ताप देणाऱ्या घटना घडून गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे, अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धन मिळण्याची शक्यता आहे. शुक्र-हर्षल शुभ योगामुळे कलेच्या क्षेत्रातील मंडळीना, उच्च चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना, गूढ संशोधकांना या महिन्याचा काळ प्रगतिकारक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे अथर्वशीर्षाचे व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना गृहसौख्य व संततिसुख या दृष्टीने या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नसल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात विविध कारणांनी अडथळे येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे व गूढ संशोधनाची मनापासून ओढ असणारांना शास्त्रीय प्रयोगांद्वारे प्रगती व यश मिळणे संभवते. वकिली, सल्लागारी, अकौंटन्सी व्यवसाय, शिक्षणक्षेत्र असे कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. पण प्रवासात त्रास वा मानहानी होण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या प्रथम सप्ताहात शारीरिक-मानसिक कष्टामुळे उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळीना मूळव्याधीचा त्रास सहन करावा लागेल. स्वाभाविक दोषांमुळे व सतत तक्रारखोर आचरणामुळे घरात कोणाशीच पटणार नाही. त्यामुळे गृहसौख्यात बाधा

येणे संभवते. जलभय, वीजभय व अपघातभय आहे. जपा. अशा एकूण परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. नवे स्नेहसंबंध वा प्रेमसंबंध जुळून येतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमाने " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध घरीदारी सर्व ठिकाणी प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. आर्थिक चिंता, आर्थिक घोटाळे, आर्थिक जबाबदाऱ्या अशा समस्यांना तोंड देणे कठिण होईल. अशा परिस्थितीत घरातील कोणाशीही न पटल्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. महिन्याच्या पहिल्या सप्ताहात दांपत्यजीवनात वाद, मतभेद यांमुळे किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. त्यानंतरच्या काळात मानसिक, शारीरिक कष्ट, अनारोग्य, उष्णताविकारांचा त्रास, काही मंडळीना मूळव्याधीचा त्रास होणे संभवते. सतत अत्यंत सावधानतेने आचरण करा. अपघात भय आहे. तसेच पाण्यापासून व विजेपासून धोका संभवतो. जपा. नोकरीत कामाचा ताण, मानहानी होणे संभवते. तसेच घरी वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती खूपच सुधारेल. आरोग्य चांगले राहील. नोकरी-व्यवसायात इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या अधिकारी मंडळींच्या ओळखी होतील व त्याचा लाभ होईल. नियोजित कामात यश मिळेल. काही मंडळीना पदोन्नती प्राप्त होणेही शक्य आहे. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक होईल. वकिली, सल्लागारी, अकौंटन्सी असे व्यवसाय असणारांना तसेच कोळसा, लोखंड बिक्रेत्यांनाही काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. शुक्राच्या अनुकुलतेमुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. अधिक अर्थलाभ होणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर कुलदैवताची किंवा श्रीगणेश उपासना व श्रीहनुमंताची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे अथर्वशीर्षाचे व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळीना या संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यात भर म्हणून या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल व अशक्त झाले असल्यास थोड्याही मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांमुळे लगेच गहरे नैराश्य येणे शक्य होईल, असे वाटते. तसेच अस्थिर, अविचारी बुद्धीचा जोर झाल्यास आपल्या फ़टकळ बोलण्याने प्रिय जन दुखावले जाण्याची शक्यता आहे. जपा. म्हणून सध्या मनावर संयम ठेवून, सहनशील बनून, तोंडाला कुलूप लावून, मौन व्रत धारण करून आचरण करणेच सुखाचे होईल. त्यासाठी अध्यात्माकडे मन वळवा. गुरु-नेपच्यून शुभ योग उपासनेद्वारे विपरीत परिस्थितीतही मन:शक्ती व सहनशक्ती देण्यास अनुकुल आहे. रवि-मंगळाच्या प्रतिकुलतेमुळे सतत मनाविरुद्ध व मनस्ताप देणाऱ्या घटना घडल्यास शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा आजार त्रस्त करील. जपा. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. कौटुंबिक जीवनात व दांपत्यजीवनात विविध कारणांनी मनस्तापच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी गैरसमजामुळे भागीदारी तुटणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. केवळ चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, कलात्मक यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना काळ थोडा

अनुकुल होईलसे दिसते. सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखून मनापासून अध्ययन करू शकले तरच या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील.  श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. " ओम गं गणपतये नम: " मंत्राचा जप करा. "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय चंचल, लहरी, अस्थिर, धाक, दडपण मुळीच सहन न होणारा असा घडण्याची शक्यता दिसते. त्यात मन अतिशय कोमल झाले व मानसिक संवेदना शीघ्र झाल्या तर लगेच गहरे नैराश्य येणे संभवते. अशा परिस्थितीत या राशीची मंडळी अकारण स्वत:ला मनस्ताप करून घेतील. जपा. या महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीची लहान मुले तर या काळात अतिशय व्रात्य, खोडकर व तापदायक झाली असल्याचा अनुभव येईल. वयाने मोठी असलेली मुलेही मनाविरुद्ध आचरण करण्याची शक्यता दिसते. रवि-मंगळ-शनि हे तिन्ही महत्त्वाचे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य त्रस्त करीलसे वाटते. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. ताप येणे, उष्णतेने फ़ोड येणे, इजा होणे, पोटविकार, मूत्राशयविकार बळावणे अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. दांपत्यजीवनात दोघांपैकी कोणा एकाचे अनारोग्य, मतभेद, वाद अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. पण आप्तेष्ट मंडळींचा त्रास होणे संभवते. स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील. यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय असणारांना, औषधविक्रेत्यांना, गुप्त पोलीस खात्यातील नोकरदार मंडळीना काळ अनुकुल व लाभदायक होईल. इतर नोकरदार मंडळींना काळ कष्टदायक व मनस्ताप देणारा असाच सिद्ध होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व श्रीहनुमंताची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " व "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

=====00000=====